MHJN020011472013

नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३
होशल्याबाई डोंगरे वि. निलावती डोंगरे व इतर
CNRMHJN020011472013

## निशाणी क्रमांक ६१ वरील आदेश

सदरचा अर्ज वादीतर्फे तिचे विरुध्द प्रतिवादीचा उलटतपास नाही झालेला आदेश बाजूला होऊन प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेकामी सादर केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

वादीतर्फे वकील अंबड येथील कोर्टात जुन्या दाव्याचे काम करण्यास दिनांक २७/०९/२०२२ रोजी गेले होते. वादी आजरोजी हजर असून तिचेतर्फे प्रतिवादीचा उलटतपास घेण्यास वकील तयार आहे. दाव्याच्या निकालासाठी प्रतिवादीचा उलटतपास होणे गरजेचे आहे. त्यासाठी वादी विरुध्द तिचे गैरहजेरी कारणास्वत प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होऊन वादीने प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी प्रतिज्ञापुर्वक मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादीतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने प्रतिवादीतर्फे नाकारली आहेत. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीचा उलटतपास होणे आवश्यक आहे.

४) वादी व प्रतिवादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादीतर्फे तिचे गैरहजेरी कारणास्तव प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला होऊन वादीने प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची मागणी केली आहे. वादीतर्फे सुविद्य वकील अंबड येथील न्यायालयात जुन्या कामाकरिता गेल्यामुळे प्रतिवादीचा उलटतपास घेण्यास ते गैरहजर राहिले असे कारण अर्जात नमूद केले आहे. परंतु, वादीविरुध्द पारित झालेला आदेश तिचे गैरहजेरी कारणास्तव झालेला आहे. तसेच, वादीचे गैरहजेरीचे कारण अर्जात नमूद नाही. प्रतिवादीतर्फे अर्जास दर्शविलेला विरोध मोघम स्वरुपाचा आहे.

६) दाव्याचे अभिलेखानुसार वादी प्रतिवादीचे उलटतपासकामी गैरहजर राहिल्याने तिचेविरुध्द प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. सदर आदेश बाजूला होऊन मिळणेकरिता वादीतर्फे सुविद्य वकीलांचे गैरहजेरीचे कारण नमूद केले असले तरीही दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी वादीकरिता प्रतिवादीचा उलटतपास होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. याकरीता सदरचा अर्ज खर्चाशिवायत मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१) अर्ज निशाणी क्र.६१ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२) परिणामतः वादीकरिता प्रतिवादीचा उलटतपास नाही असा झालेला आदेश बाजूला करण्यात येत असून वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2022.10.19 17:45:18 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः १९/१०/२०२२ दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : १९/१०/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)